| | |
|---|---|
| | दाखल दिनांक ०१.१०.२०२५ |
| | नोंदणी दिनांक- ०१.१०.२०२५ |
| | निकाल दिनांक- ०४.०५.२०२६ |
| | कालावधी - वर्षे महिने दिवस.<br>०० ०७ ०३ |

## भाग -अ

**[ परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा ता.पन्हाळा,**
**जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात.**
(पिठासीन अधिकारी : एस.व्ही.जंगमस्वामी)

**नियमीत फौजदारी खटला क्रमांक १००/२०२५ निशाणी क्र. २६/ब**

| न्यायनिर्णय दिनांक : ०४.०५.२०२६ | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल/ अपराध क्र. १३९ /२०२५ | पन्हाळा पोलीस ठाणे, पन्हाळा जि.कोल्हापूर भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८ (१),११५ (२), ३५२ सह कलम ३(५) प्रमाणे. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार,<br>मार्फत : सहा.पोलिस निरिक्षक पन्हाळा पोलीस ठाणे, ता.पन्हाळा जि.कोल्हापूर. |
| **अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता** | अॅड. एस.एस.गर्जे सहा.सरकारी अभियोक्ता |
| **विरूद्ध** | |
| **आरोपी** | १.बापु गणपती दळवी ,व.व.४४,धंदा-शेती,<br>२.ओंकार बापु दळवी, व.व.१९,धंदा-घरकाम,<br>३.पृथ्वीराज जयवंत सावेकर,व.व.२०,धंदा-घरकाम,<br>४.आकाश दिनकर दळवी, व.व.२६,धंदा-घरकाम,<br>सर्व रा. दळवेवाडी, ता.पन्हाळा जि. कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | अॅड. आर.आर.तोरसे, विधीज्ञ |

## भाग -ब

### [ परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ०२.०७.२०२५ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०३.०७.२०२५ |
| चार्जशीट (अंतीम अहवाल) दिनांक | ०१.१०.२०२५ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | १६.१२.२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक | १६.०३.२०२५ |
| न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०४.०५.२०२६ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | ..... |

### आरोपींचा तपशील

| आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनावर सोडलयाचा दिनांक | गुन्हा / आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी बी.एन.एस.एस. ४६८ नुसार सुट देणेकरीता |
|---|---|---|---|---|---|---|
| १.बापु गणपती दळवी ,<br>२.ओंकार बापु दळवी,<br>३.पृथ्वीराज जयवंत सावेकर,<br>४.आकाश दिनकर दळवी, | बी.एन.एस. ३५(३) प्रमाणे नोटीस दिली | -- | भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८ (१),११५ (२), ३५२ सह कलम ३(५) प्रमाणे . | आरोपींना निर्दोष मुक्त करणेत येते | ... | ... |

## भाग -क

### [ परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]

### अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

## अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र. १ | सजित हिंदुराव सावेकर | फिर्यादी |
| सा.क्र. २ | हिंदुराव बापु सावेकर | जखमी साक्षीदार |

## ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| को.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी

## अ. अभियोग पक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी २०/क | फिर्याद वरील सही |

## ब. बचाव पक्ष :

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २२/क | घटनास्थळ/जप्ती पंचनामा |
| २. | २३/क | साक्षीदार हिंदुराव बापु सावेकर याचे वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ३. | २४/क | फिर्यादी सजित हिंदुराव सावेकर याचे वैद्यकिय प्रमाणप |

## क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल :-

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३०/२०२५ | १. एक चिव्याची काठी तिला सहा पेरी व पाच गाठी |

| | | |
|---|---|---|
| | | असलेली जुनी वापरती.<br>२. एक चिव्याची काठी तिला सात पेरी व सहा गाठी असलेली जुनी वापरती. |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक ०४.०५.२०२६ )

१. प्रस्तुतचा खटला हा आरोपींचे विरुद्ध भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८ (१),११५ (२), ३५२ सह कलम ३(५)अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन -**

२. आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा सासरा आहे. आरोपी क्र.२ ओंकार हा फिर्यादीचा मेव्हणा आहे. आरोपी क्र. ३ धिरज उर्फ पृथ्वीराज हा फिर्यादीचे पत्नीचे आत्तीचा मुलगा आहे तसेच आरोपी क्र. ४ आकाश हा फिर्यादी यांचे चुलत मेव्हणा आहे. दि. ०२.०७.२०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पन्हाळा येथील फिर्यादीच्या राहत्या घरी फिर्यादीने त्याचे पत्नीस वारंवार माहेरी का जातेस तसेच तिला वापरण्यासाठी दिलेल्या मोबाईलला स्क्रॅस पाडलेबाबत विचारणा केली. त्यावेळी फिर्यादीची पत्नी फिर्यादीस उध्दट बोलल्याने फिर्यादीने त्याच्या पत्नीस एक चापट मारली. त्यानंतर दि. ०२.०७.२०२५ रोजी २०.०० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील फिर्यादीचे राहते घरी ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे आरोपी क्र.१ हे फिर्यादीचे घरी आले असता फिर्यादीचे पत्नीने वरील घडलेला प्रकार सांगितला. त्याबाबत आरोपी क्र.१ याने फिर्यादी याचे वडीलांना शिवीगाळ करुन हाताने व लाथांनी मारहाण केली. तसेच त्यावेळी फिर्यादी यांचे पत्नीने भांडण सोडविले. त्यानंतर आरोपी क्र.१ याने त्याचे घरी फोन करुन मारहाण झालेबाबत कळविलेनंतर आरोपी क्र. २, ३ व ४ हे तेथे आले आणि आरोपी क्र. ४ याने फिर्यादीचे वडीलांना धरले व आरोपी क्र. ३ याने फिर्यादीचे वडीलांच्या डोक्यात पाठीमागील बाजुस काठीने मारहाण करुन जखमी केले. आरोपी क्र. १ याने आरोपी क्र.४ याचे हातातील काठी घेवून फिर्यादीचे पाठीत मारुन जखमी केले. तसेच आरोपी क्र.१ याने आरोपी क्र. ४ याचे हातातील काठी घेवून फिर्यादीचे पाठीत मारुन आरोपी क्र.३ याने फिर्यादी यांना पाडुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन जखमी केले अशा स्वरुपाची फिर्याद फिर्यादीने पन्हाळा पोलीस ठाणे येथे दाखल केली.

३. फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्याद वरुन ठाणे अंमलदार यांनी गु.र.नंबर १३९/२०२५ हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास हा पोलिस हेड कॉन्स्टेबल डी.बी.हारुगडे यांच्याकडे दिला. तपासाकामी त्यांनी घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळावरुन दोन चिव्याच्या

काठ्या जप्त करुन त्याचा घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यांनी फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यांनी तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८ (१),११५ (२), ३५२ सह कलम ३(५) निशाणी क्र.१२ अन्वये दोषारोप नोंदविला व निशाणी क्र. १३ ते १६ अन्वये आरोपी क्र.१ ते ४ यांचे निवेदन नोंदविले. त्यामध्ये आरोपींनी गुन्हा अमान्य करुन त्यांचेविरुध्द खटला चालविण्याकामी विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

६. आरोपीं विरुध्द अभिलेखावर कोणताही दोषात्मक पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन हे सोडून देण्यात आले.

७. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता अॅड.एस.एस.गर्जे आणि बचाव पक्षातर्फे विधिज्ञ अॅड आर.आर.तोरसे यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्याचे निकालासाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यावर मी नोंदविलेले कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणेः

| अ.नं. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की दिनांक दि. ०२.०७.२०२५ रोजी २०.०० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील फिर्यादीचे राहते घरी कोडोली, ता.पन्हाळा जि.कोल्हापूर येथे आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीचे वडीलांना डोक्यात पाठीमागील बाजुस व पाठीत काठीने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली आणि त्या काठीचा सदर गुन्हयात हत्यार म्हणुन वापर केला आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **...नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीस आणि फिर्यादीच्या वडीलांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्यांना | |

| | | |
|---|---|---|
| | ईच्छापुर्वक साधी दुखापत केली व त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ११५(२) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **...नकारार्थी.** |
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीचा व त्याचे वडीलांचा उद्देशपुर्वक अपमान करुन, त्यांना शिवीगाळ करुन त्यांना प्रक्षोभित केले व त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य करण्यात उद्युक्त केले व त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **...नकारार्थी.** |
| ४. | कोणता आदेश ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

८. अभियोगपक्षाने आरोप सिध्दी पृष्ठर्थ फिर्यादी सजित हिंदुराव सावेकर (सा.क्र.१) याची साक्ष (निशाणी क्र.१९) आणि जखमी साक्षीदार हिंदुराव बापुराव सावेकर (सा.क्र२) याची साक्ष (निशाणी क्र.२१) वर नोंदविली. फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत सदर प्रकरणा संदर्भात न्यायालयाबाहेर त्यांची तडजोड झाल्याबाबत तशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.१८) वर दाखल करण्यात आली. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ/जप्ती पंचनामा (निशाणी क्र. २२) आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र. २३ व २४) हे मान्य करण्यात आले. त्यानंतर फिर्यादीने आपला पुरावा हा निशाणी क्र. २५ वर पुरसिस दाखल करुन बंद केला. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा हा निशाणी १ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत</u>** :

९. मुद्या क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रित चर्चिले आहेत. फिर्यादी सजित (सा.क्र.१) याने आपल्या पुराव्यात असे सांगितले की, घटना ही कधी घडली हे त्याला आठवत नाही. दि. ०२.०७.२०२५ रोजी त्याच्या आणि आरोपीच्या मध्ये किरकोळ भांडणे झाली होती त्यामुळे त्याने पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली होती. त्याने फिर्याद वरील त्याची सही ओळखली परंतू त्यामधील मजकूर त्याला माहिती नसल्याचे सांगीतले. त्याने त्याच्या पुराव्या दरम्यान पुढे असे सांगितले की, दि.

०२.०७.२०२५ रोजी संध्याकाळी ०६.३० वाजताच्या सुमारास आरोपीने त्याला व त्याच्या वडीलांना शिवीगाळ करुन काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली असे काही घडले नसल्याचे त्याने सांगीतले. त्याने त्याच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितुर घोषित करून त्याचा उलटतपास घेतला.

१०. अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान त्याने फिर्याद मधील अधोरेखांकित भाग "अ" मधील मजकुराबाबत त्याला काही माहिती नसल्याचे सांगून पोलिसांनी तसा मजकूर त्याच्या जबाबात का नमुद केला याचे कारण तो सांगू शकत नाही असे सांगीतले. त्याने त्याच्या उलटतपासा दरम्यान पुढे असे सांगीतले की सदर प्रकरणा संदर्भात त्याच्यात व आरोपींच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असून त्यास पुरक अशी तडजोड पुरसीस निशाणी क्र. १८ नुसार दाखल केली आहे. सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटले असल्याने त्याची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही.

११. हिंदुराव (सा.क्र.२) हा फिर्यादीचा पिता असून तो जखमी साक्षीदार आहे. त्याने आपल्या पुराव्यामध्ये असे सांगितले की, घटना ही कधी घडली हे त्याला आठवत नाही. पोलिसांनी त्याच्याकडे कोणतीही चौकशी केली नाही आणि त्याचा कोणताही जबाब हा नोंदवला नाही. त्याने त्याच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितुर घोषित करून त्याचा उलटतपास घेतला. परंतु उलटतपासा दरम्यान त्याने अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. त्याने त्याच्या उलटतपासा दरम्यान असे सांगीतले की, सदर प्रकरणा संदर्भात फिर्यादी, त्याच्या व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असून त्या संदर्भात त्यांनी निशाणी क्र.१८ वर तडजोड पुरसीस दाखल केली आहे. त्याने त्याची आता आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही असे सांगितले.

१२. अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी सजित (सा.क्र.१) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्याने घटना ही कधी घडली हे त्याला आठवत नसल्याचे सांगीतले. त्याने त्यावेळेस त्याच्या व त्याच्या पत्नीमध्ये वाद झाले होते असे सांगितले. दि.०२.०७.२०२५ रोजी आरोपीने त्याला व त्याच्या वडीलांना शिवीगाळ करुन काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली असे काही घडले नसल्याचे सांगीतले. तसेच त्याने फिर्याद मधील मजकूर हा त्याला माहिती नसल्याचे सांगितले. तो फितुर साक्षीदार आहे. त्याने अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये कोर्टाबाहेर तडजोड

झाल्याचे सांगितले आणि त्याची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१३. हिंदुराव (सा.क्र.२) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याने घटना ही कधी घडली हे त्याला माहिती नसल्याचे सांगून पोलिसांनी त्याच्याकडे घटने संदर्भात कोणतीही चौकशी केली नाही आणि त्याचा कोणताही जबाब नोंदवला नाही असे सांगीतले. तो फितुर साक्षीदार आहे. त्याने अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात त्याचेत व आरोपींची कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आणि त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१४. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ/जप्ती पंचनामा (निशाणी क्र.२२) आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार याचे वैद्यकिय प्रमाणपत्र (निशाणी क्र.२३ व २४ ) हे मान्य करण्यात आले. परंतू फिर्यादी सजित (सा.क्र.१) आणि जखमी साक्षीदार हिंदुराव (सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान आरोपींनी त्यांना कोणतीही शिवीगाळ व मारहाण केली नाही असे सांगीतले. त्यामुळे वैद्यकिय प्रमाणपत्रामधील नमुद जखमा या आरोपींनी फिर्यादीला व जखमी साक्षीदाराला मारहाण केल्यामुळे झाल्या असे म्हणता येत नाही.

१५. अभियोग पक्षामार्फत तपासणेत आलेल्या फिर्यादी सजित (सा.क्र.१) आणि जखमी साक्षीदार हिंदुराव (सा.क्र.२ ) हे फितुर साक्षीदार असून त्यांनी त्यांचे उलटतपासा दरम्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांचेमध्ये व आरोपींमध्ये तडजोड झाली असून सदरचे प्रकरण हे तडजोडीने कोर्टाबाहेर मिटल्याचे सांगितले. त्यास पुरक अशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.१८) ही फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत दाखल करण्यात आली. फिर्यादी सजित (सा.क्र.१) आणि जखमी साक्षीदार हिंदुराव (सा.क्र.२ ) यांचा पुरावा आणि तडजोड पुरसीस (निशाणी क्र.१८) यांचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरण संदर्भात फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटल्याचे दिसून येते. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेल्या साक्षीदार क्र.१ व २ यांचा पुरावा हा आरोपींविरूद्ध लावलेल्या गुन्हयातील घटकांची सिध्दता होणेकामी तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो.

१६. एकुणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेले फिर्यादी सजित (सा.क्र.१) आणि जखमी साक्षीदार हिंदुराव (सा.क्र.२) हे फितुर साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात दरम्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांच्यात व आरोपींमध्ये सदरचे प्रकरण हे कोर्टाबाहेर तडजोडीने मिटल्याचे सांगितले. तसेच त्यास पुरक अशी

तडजोड पुरसीस ही (निशाणी क्र.१८) वर दाखल केली. त्यामुळे फिर्यादी सजित (सा.क्र.१) आणि जखमी साक्षीदार हिंदुराव (सा.क्र.२) यांच्या पुराव्याचे आणि तडजोड पुरसीस (निशाणी क्र.१८) यांचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरणा संदर्भात फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये तडजोडीने सदरचे प्रकरण मिटल्याचे दिसून येते. त्यामुळे साक्षीदार क्र.१ व २ यांचा पुरावा हा आरोपींविरूद्ध लावलेले आरोप शाबीत करण्याकरीता तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपविरूध्द लावलेले आरोप हे संशयापलीकडे जावुन सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे संशयाचा फायदा हा आरोपींना देणे न्यायोचित होणार आहे. अभियोगपक्ष हा आरोपींविरूध्द लावलेले भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१),११५ (२) आणि ३५२ सह कलम ३(५) अन्वयेचे आरोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला. सबब, त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवते.

१७. जप्त मुद्देमाल दोन चिव्याच्या काठया या उपयोगहीन व मुल्यहीन असल्याने त्या अपिल कालावधी नंतर नियमा नुसार नाश करण्यात यावेत.

**<u>मुद्या क्रमांक ४ बाबतः</u>**

१८. मुद्या क्रमांक १ ते ३ च्या नकारार्थी निष्कर्षावरून मी मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरा दाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. आरोपी क्र.१ बापु गणपती दळवी, आरोपी क्र.२.ओंकार बापु दळवी, आरोपी क्र.३. पृथ्वीराज जयवंत सावेकर आणि आरोपी क्र.४. आकाश दिनकर दळवी यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७१(१) प्रमाणे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (१),११५ (२) आणि ३५२ सह कलम ३(५) च्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल दोन चिव्याच्या काठया या उपयोगहीन व मुल्यहीन असल्याने त्या अपिल कालावधी नंतर नियमा नुसार नाश करण्यात यावेत.

३. आरोपी क्रमांक १ ते ४ यांचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

४. आरोपी क्रमांक १ ते ४ यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४८५ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तीक जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.05.04 13:45:52 +0530

एस.व्ही.जंगमस्वामी ,
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा
जिल्हा-कोल्हापूर

ठिकाण : पन्हाळा
दिनांक :०४.०५.२०२६